साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

✲ सातारा ✲ वर्ष १ ✲ अंक १२ ✲ मराठी ✲ सोमवार १७ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२६ ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ पाने ४ ✲ किंमत ३ रुपये

✲ Satara ✲ Year 1 ✲ Volume 12 ✲ Marathi ✲ Monday 17 August to 23 August 2026 ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ Page 4 ✲ Price 3 Rs.

## गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार होते


### स्वातंत्र्यदिनी कराडातील पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण यांचा गौप्यस्फोट

**कराड (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपचे दिवंगत ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांच्याबद्दल मोठा गौप्यस्फोट केला आहे. गोपीनाथ मुंडे काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यासाठी इच्छुक होते. त्यांच्या पक्षप्रवेशासाठी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना विचारण्यात आलं होतं. सोनिया गांधी यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या पक्षप्रवेशाला परवानगी दिली होती. पण तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या केंद्रातील मंत्रिपदाच्या अटीमुळे पक्षप्रवेशाला मान्यता दिली नव्हती, असा मोठा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना याबाबतचा दावा केला आहे.

मी मुख्यमंत्री असताना गोपीनाथ मुंडे यांना काँग्रेसमध्ये घेण्याचा आम्ही प्रयत्न केला होता. आमचं सगळं ठरलं. सोनिया गांधींची मी परवानगी घेतली. त्यांनी माझ्याकडे अट ठेवली. मला खासदारकीचा राजीनामा द्यावा लागले. मला केंद्रात मंत्री करा. अन्यथा भाजपचे नागपूरचे दोघे नेते मला परत निवडून येऊ देणार नाहीत. तिथे त्यावेळेला जातीवादाचा विषय होताच, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

मी तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांना न विचारचा सोनिया गांधी यांना गोपीनाथ मुंडे यांच्या काँग्रेस प्रवेशाबद्दल विचारलं होतं. मला पंतप्रधानांनी बोलावलं,



त्यांनी मला विचारलं की, तू परस्पर त्यांना आश्वासन दिलं का? माझ्या लगेच लक्षात आलं. सोनिया गांधी यांना विचारलं, पण तुम्हाला विचारलं नाही ही मोठी चूकच झाली. भाजपच्या म्हणजे विरोधी पक्षाच्या गटनेत्याला आपल्या पक्षात घेऊन मंत्री करणं हे लाज गेल्यासारखं आहे. मी बिलकूल करणार नाही, असं मनमोहन सिंह म्हणाले, असा दावा चव्हाण यांनी केला.

मनमोहन सिंह पहिल्यांदा माझ्यावर रागावले. मी डोक्याला हात लावला. म्हटलं, काय मी मोठी चूक केली. यावर मार्गच नाही ना, विचारायला हवं होतं. मंत्रिमंडळ करायचा अधिकार कुणाचा असतो? सोनिया गांधी यांनी मान्यता दिली. पण पंतप्रधान मंत्रिमंडळाबाबत निर्णय घेतात. मी काय बोलावं आणि तोंड कुठे लपवावं ते मला कळत नव्हतं. मी आलो आणि शेवटी सांगितलं, सॉरी. हे शक्य होणार नाही, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

**माझे वडील कमळातच जन्मले आणि कमळातच विसावले : पंकजा मुंढे**

त्याबद्दल आता काय करायचं? आता त्याचा काही पुरावा नाही. गोपीनाथ मुंडे आता हयात नाहीत. त्यामुळे आता त्यांच्याविषयी आम्ही वक्तव्य करणं उचित नाही. त्या काळाबद्दल टिप्पणी मला करता येणार नाही. कारण त्यावेळी मी नव्हते. पण मला जे माझे वडील कळले, ते कमळातच जन्मले आणि कमळातच विसावले आहेत. त्यांचा पूर्ण प्रवास भाजपात आहे, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली.

दरम्यान, पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडून ज्या गोपीनाथ मुंडे यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे, ते महाराष्ट्रातील भाजपचे एकेकाळचे प्रमुख नेत्यांपैकी एक होते. महाराष्ट्रात भाजप संघटनात्मक दृष्टीकोनातून वाढवण्यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी खूप परिश्रम घेतले होते. भाजप पक्ष वाढवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. गोपीनाथ मुंडे यांनी भाजप विरोधी बाकावर असताना विरोधी पक्षातील नेते म्हणून आपलं काम चोखपणे पार पाडलं होतं. २०१४ मध्ये भाजपला लोकसभा निवडणुकीत मोठं यश मिळालं होतं. त्यावेळी गोपीनाथ मुंडे केंद्रात ग्रामविकास मंत्री झाले होते. पण दुर्दैवाने त्यानंतर ३ जून २०१४ रोजी त्यांच अपघाती निधन झालं होतं.



## शिवसमर्थ मल्टीस्टेटचा २० वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

### भव्य रक्तदान व मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उदंड प्रतिसाद

**कराड (हॅलो न्यूज)**

सहकार क्षेत्रात आपल्या उत्कृष्ट आणि विश्वासू सेवेने अल्पावधीतच ग्राहकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या शिवसमर्थ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या मुख्य कार्यालय व तळमावले शाखेचा वर्धापन दिन सोहळा शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी अत्यंत दिमाखात आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. केवळ व्यावसायिक प्रगती न साधता सामाजिक बांधिलकी जपण्याच्या संस्थेच्या परंपरेनुसार, यंदाचा वर्धापन दिन सोहळा विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून सकाळी शिवसमर्थ भवन या मुख्य कार्यालयाच्या इमारतीत मंगलमयी वातावरणात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. विधिवत पूजा अर्चा करण्यात आली. या प्रसंगी तळमावले परिसर आणि तालुक्यातील असंख्य सभासद, ठेवीदार, ग्राहक आणि हितचिंतकांनी उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घेतला.

वर्धापन दिनाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे संस्थेने आयोजित केलेले भव्य रक्तदान शिबिर. बालाजी ब्लड सेंटर, सातारा यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सध्या रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन संस्थेने घेतलेल्या या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक झाले. संपूर्ण सोहळा आणि विविध सामाजिक उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष अ‍ॅड. जनार्दन लक्ष्मण बोत्रे साहेब, संस्थेचे सीईओ श्री हेमंत तुपे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सर्व संचालक मंडळ, सल्लागार, अधिकारी आणि कर्मचारी प्रतिनिधी यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

## सामाजिक बहिष्काराचा प्रश्न संवादाने सुटला !

### सातारा पोलीस दल आणि महाराष्ट्र अंनिस यांच्या प्रयत्नांना यश

**विशाल पाटील (हॅलो न्यूज)**

सातारा तालुक्यातील वडूथ नजीकच्या आसगाव गावातील श्री प्रतिक शंकर चौधरी कुटुंबावर भावकीतील लोकांनी सामाजिक बहिष्कार घातला होता त्याच्या अनुषंगाने निर्माण झालेला त्यांच्या जगण्याचा गंभीर प्रश्न सातारा पोलीस आणि महाराष्ट्र अंनिस यांच्या प्रयत्नांनी सुटला. या विषयी सविस्तर माहिती पुढील प्रमाणे आसगाव मधील प्रतिक चौधरी प्रश्न भावकीतील कोणत्याही सामाजिक अथवा धार्मिक कार्यक्रमात या कुटुंबाला जाणीवपूर्वक बोलावले जात नव्हते. तसेच काही लोकांकडून त्यांना बोलावू नये असा दबाव टाकला जात होता त्यामुळे चौधरी कुटुंबीय मनाने खचले होते.सामाजिक बहिष्काराच्या प्रभावाने त्यांच्या किराणा दुकानातून समान खरेदी करणे देखील कमी झाले होते याचा आर्थिक जाच देखील कुटुंबाला होत होता.

या बाबत जागरून गावकरी अतुल शिंदे यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे सामाजिक बहिष्कार बाबत तक्रार केल्यानंतर डॉक्टर हमीद दाभोलकर यांनी



सहकाऱ्यांसह आणि पीडित कुटुंबीयांना घेऊन पोलीस अधीक्षक निखील पिंगळे साहेब यांची भेट घेऊन चर्चा केली. अधीक्षक निखील पिंगळे यांनी गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून साहेबांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले विभागीय पोलीस उपाधीक्षक माननीय विपुल पाटील साहेब यांनी पीडित व्यक्तींची माहिती घेऊन गावात हा प्रश्न सोडवण्याची

(जागर..)

आश्वासन दिले त्यानुसार तालुका पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांना सूचना देऊन गावात सर्व लोकांची मिटिंग घेतली आणि हा प्रश्न सोडवन्यास मदत व मार्गदर्शन केले.

यावेळी संवाद करताना विभागीय पोलीस उपाधीक्षक विपुल पाटील यांनी सांगितले कि आपण माणूस आहोत पक्षी किंवा प्राणी नाही त्यामुळे माणसासारखे वागूया प्राणी व पक्षी दुसऱ्या एखाद्या पक्षी प्राण्याला आपल्या कळपात घेत नाही पण माणसाचे तसे नाही आपण समाजशील आहोत समाजाशिवाय आपण राहू शकणार नाही त्यामुळे जाणीवपूर्वक बहिष्कृत करणे किंवा त्याला अशा प्रकारचे कार्यक्रमाना न बोलावण्याची वागणूक देणे हे माणुसकीचे लक्षण नाही हा प्रश्न सामंजस्याने सोडवा असे आवाहन यांनी केले ते पुढे म्हणाले की माणुसकीच्या भावनेतूनच आपले प्रयत्न चालू आहेत की हा प्रश्न इथे सुटावा तसा तो सुटला नाही तर कायद्याचा मार्ग अवलंबावा लागेल आणि मग ते संबंधित व्यक्तींना त्रासदायक ठरेल. असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी सानाजिक बहिष्कार विरोधी कायद्याची माहिती देखील देण्यात आली.

गावातील लोकांना याचे गांभीर्य लक्षात आल्याने या विषयी पुढाकार करण्याचे मान्य केले तसेच गावातील सरपंच पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष आणि ज्येष्ठ नागरिक यांनी हा प्रश्न सुटला असल्याचे लेखी द्यावे अशा सूचनाही त्यांनी उपस्थित त्यांना केल्या.

पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांनी संबंधित तक्रारीबाबत गावकऱ्यांसमोर सविस्तर माहिती घेतली.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड सी.आर. बर्गे ,यांनी मार्गदर्शन केले शंकर कणसे यांनी सामाजिक बहिष्कार कायद्याबाबत माहिती दिली. उदय चव्हाण यांनी आभार मानले.

संबंधित मीटिंगच्या वेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉक्टर दीपक माने, वंदना माने, भगवान रणदिवे, सुधाकर बर्गे, मधुकर माने, शिवाजी शिंदे, गावच्या सरपंच अ‍ॅड स्वाती जगताप, उपसरपंच हिरालाल शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णदेव शिंदे, पोलीस पाटील संदीप माने, तलाठी संतोष विषय, पेठ हवलदार रामचंद्र गोरे, मराठा महासंघाचे जिल्हा युवा अध्यक्ष अतुल शिंदे, पोलीस पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. अशा प्रकारे सामाजिक बहिष्कार टाकला जात असल्याचे लक्षात आले तर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या हेल्पलाईन ९९२००४८८३२ या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

संपादकीय

# देशभक्तीची ज्योत पेटवणारे शिल्पकार

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याच्या या महान घटनेच्या निमित्ताने, मी प्रत्येक भारतवासीयाला मनापासून शुभेच्छा देतो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांनी स्वतःचे बलिदान दिले, त्या सर्वांनाही आदरपूर्वक अभिवादन करतो. गेल्याच आठवड्यात मी अंदमान आणि निकोबार बेटांना भेट दिली. माझ्या या भेटीदरम्यान, हर घर तिरंगा अभियानाचा एक भाग म्हणून मला आपला राष्ट्रध्वज फडकवण्याचा तसेच आपले थोर देशभक्त नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पहिल्यांदा फडकवलेल्या तिरंग्याला वंदन करण्याचा तसेच त्यांचे स्मरण करण्याचा बहुमान मिळाला. ३० डिसेंबर १९४३ रोजी नेताजींच्या आझाद हिंद सेनेने भारतीय भूभागावर जिथे पहिल्यांदा तिरंगा फडकवला होता, अगदी त्याच पवित्र भूमीवर उभे राहणे हा माझ्यासाठी खरोखरच अत्यंत भावूक करणारा अनुभव होता. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पशुपॉन मुथुरामलिंग थेवर यांच्या निमंत्रणावरून सप्टेंबर १९३९ मध्ये मदुराईला भेट दिली होती, त्यांच्या या भेटीचे स्मरणही या घडामोडींनी मला करून दिले. त्यावेळच्या या ऐतिहासिक घडामोडीने या प्रदेशातील असंख्य देशभक्तांना प्रेरणा दिली होती.

राष्ट्रीय स्मारक असलेल्या सेल्युलर कारागृहाला दिलेली भेट हा देखील माझ्यासाठी दुसरा अत्यंत प्रेरणादायी क्षण ठरला. वसाहतवादी हुकूमशाहीने भारतमातेचे थोर सुपुत्र वीर सावरकर, योगेंद्र शुक्ला, बटुकेश्वर दत्त, शचिंद्र नाथ सान्याल आणि इतर अनेकांना या कारागृहात तुरुंगात डांबून एकांतात ठेवले होते. अगदी आजही या राष्ट्रीय स्मारकाच्या भिंती भारत स्वतंत्र व्हावा आणि सन्मानाने जगावा म्हणून आपले प्राण पणाला लावलेल्या त्या शूरवीरांच्या धैर्याच्या, त्यांनी भोगलेल्या यातनांच्या आणि त्यांच्या सर्वोच्च त्यागाच्या कथा आपल्याला सांगत असतात.

आज आपण भारत छोडो आंदोलनाचे स्मरण करत आहोत आणि अशावेळी मला ९ ऑगस्ट रोजी अंदमान बेटांवर हर घर तिरंगा अभियानाचा शुभारंभ करण्याचे लाभलेले भाग्य, ही मला असीम आनंदाची अनुभूती देणारी घटनाच ठरली. १९४२ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी भारत छोडो आंदोलनाला सुरुवात केली आणि त्यासोबतच देशाला करेंगे या मरेंगे ही स्फूर्तिदायक घोषणा दिली. त्यांच्या या आवाहनामुळेच तर, देशभरात स्वातंत्र्य मिळवण्याच्या एका तीव्र इच्छेने जोर धरला. त्या काळात वसाहतवादी सत्तेविरुद्ध खंबीरपणे उभ्या राहिलेल्या पिढीमुळेच, आज आपल्याला स्वतंत्र देशाचे नागरिक म्हणून श्वास घेण्याचे आणि लोकशाही व्यवस्थेअंतर्गत घटनात्मक हक्कांसह जगण्याचे भाग्य लाभले आहे. या देशाच्या कानाकोपऱ्यातील लाखो शूर स्वातंत्र्यसैनिकांनी आपली अढळ निष्ठा आणि त्यागाने लढा दिला, आपली भारतमाता मुक्त व्हावी यासाठी अनेकांनी आपल्या मौल्यवान प्राणांची आहुती दिली.

# पाणंद रस्ते योजना समितीच्या सहअध्यक्षपदी रणजित पाटील यांची निवड



**कराड (हॅलो न्यूज)**

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठित केलेल्या समितीच्या सह अध्यक्षपदी वडगावचे माजी सरपंच, उपाध्यक्ष भाजपा कराड उत्तर, सरपंच परिषदेचे कार्याध्यक्ष रणजित पाटील यांची निवड करण्यात आल्याने भाजपचे आमदार मनोजदादा घोरपडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वकांक्षी योजना म्हणून ज्याकडे पाहिले जातात ती योजना म्हणजे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते ही योजना अधिक सक्षम करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्येक मतदारसंघात सहअध्यक्षांची नियुक्ती केली आहे. त्यात कराड उत्तर मधून वडगावचे रणजित पाटील यांची वर्णी लागली आहे.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कामात समन्वय वाढून योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल. तसे पहिले तर राज्य शासनाने एकूण ९१ विधानसभा क्षेत्रामध्ये सहअध्यक्ष यांची नेमणूक केली आहे. त्यात प्रामुख्याने सह अध्यक्षपदी विधान परिषद आमदार, माजी आमदार असे एकूण १६ आमदार आहेत. आजी माजी, जिल्हा परिषद सदस्य, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य अशा लोकप्रतिनिधी, सामाजिक, राजकीय वजनदार व्यक्तीची निवड केली आहे. त्यात कराड उत्तर मधून आमदार मनोजदादा यांनी त्यांचे निष्ठावंत कार्यकर्ते रणजित अप्पा पाटील यांना काम करण्याची संधी दिली.

रणजित आप्पा हे वडगाव मधून प्रतिष्टीत राजकीय घराण्यातील आहेत. त्याचे आजोबा गावचे पंधरा वर्ष सरपंच होते. वडील स्वर्गीय ॲड. विनायकराव पाटील हे जुने उच्च विद्या विभूषीत, कायदा तज्ञ होते. रणजित आप्पा स्वतः २०१५ ते २०२० पर्यंत सरपंच होते. त्यानी त्यांच्या सरपंच पदाच्या काळात वडगाव गावचा सर्वांगीण विकास केलेला आहे. कोट्यावधी रुपयांची विकासकामे त्याना साकरण्यात यश आले आहे. शेत रस्ता, पाणंद रस्ता या समस्या त्यांना अवगत आहेत. त्यांची वडगांव गावावर मजबूत पकड आहे. गेली चाळीस वर्षे विकास सेवा सोसायटीवर त्याच्या विचाराच्या गटाचे वर्चस्व आहे. महसूल विभागाने यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार रस्त्यांचा लाभ लवकर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



# कन्याशाळा मलकापूरचे सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग यश

**कराड (हॅलो न्यूज)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांचेमार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२५- २०२६ चा अंतिम निकाल काल जाहीर झाला यामध्ये श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या कन्याशाळा मलकापूरच्या विद्यार्थिनींनी जिल्हा गुणवत्ता यादीत येत विद्यालयाची उत्तुंग यशाची परंपरा कायम राखली. कु. सानवी खराडे २६८ गुण - जिल्हा गुणवत्ता यादीत ४१ वी शहरी सर्वसाधारण विभाग) तर कु. आराध्या जाधव २६२ गुण -जिल्हा गुणवत्ता यादीत ६७ वी (शहरी सर्वसाधारण विभाग) येण्याचा बहुमान मिळविला व कन्याशाळा मलकापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विद्यालयाच्या एकूण सात विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. त्यामध्ये कु.शार्वी जाधव, कु.रेवती तडाखे, कु. अश्विनी कटकदौंड, कु. गार्गी जाधव,कु. सान्वी संकपाळ या विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या.

या सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थिनीचे व त्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेचे सचिव शेतीमित्र मा.अशोकराव थोरात भाऊ, अध्यक्ष मा. भास्करराव पाटील, उपाध्यक्ष मा. वसंतराव चव्हाण, खजिनदार मा.तुळशीराम शिर्के, मार्गदर्शक संचालिका डॉ.सौ.स्वाती थोरात,संचालक मा. प्रा. संजय थोरात, संचालक मा. पवन पाटील सर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुलोचना भिसे, पर्यवेक्षिका सौ. करुणा शिर्के, सर्व शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी सर्व विद्यार्थिनी व पालक यांनी अभिनंदन केले. व विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला दाद दिली. विद्यार्थिनींच्या या यशामुळे पालक वर्गातून विद्यालयाचे कौतुक होत आहे.

# अपहरण करून खंडणी मागणाऱ्या चौघांना अटक

## अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी : कराड तालुका गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई



**कराड (हॅलो न्यूज)**

जमीन व्यवहाराच्या कारणातून एका व्यक्तीचे अपहरण करून त्याच्याकडे १० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी करणाऱ्या चौघांना कराड तालुका पोलिसांकडून अवघ्या ३० तासांत अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अपहरणाच्या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

या प्रकरणी कुणाल सुनील चव्हाण (वय ३१, रा. कोपर्डे हवेली, ता. कराड) याच्यासह दोन पुरुष व एका महिला आरोपीला ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी कराड तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारदाराला आरोपींनी संगनमत करून कोपर्डे हवेली (ता. कराड) येथून पांढऱ्या रंगाच्या चारचाकी वाहनातून नेले. त्यानंतर कराड-सुर्ली मार्गावर नेऊन जमीन व्यवहारावरून दमदाटी करण्यात आली. याचदरम्यान एका महिला आरोपीने तक्रारदाराच्या हिस्सेबाबतचे अश्लील फोटो/व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी देत त्याच्याकडे १० हजार रुपयांची खंडणी मागितली होती.

याबाबत पोलिसांना संबंधित आरोपी पुणे येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांचे पथक पुण्याकडे रवाना झाले. कारवाईदरम्यान तीन पुरुष व एका महिला आरोपीला ताब्यात घेण्यात आले व चौकशी अंती आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. शिवाय गुन्ह्यात वापरलेली कारही जप्त करण्यात आली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक डॉ. वैशाली कडकर यांच्या सूचनेनुसार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कराड तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शितलतुलकुमार कोल्हाळ यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक भुजबळ, पोलिस अंमलदार येळवे, सचिन निकम, सागर शिवदास, किरण बामणे, प्रफुल्ल गाडे, विजय यादव व मयूर देशमुख यांनी केली.

# दिव्यांगांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा : पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा, जिमाका**

दिव्यांग घटकाला केवळ शासकीय मदतीवर अवलंबून न ठेवता त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी करा. तसेच त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध स्वयंरोजगारांचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणा, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांग बांधवाच्या अडीअचणी सोडविण्या संदर्भात बैठक झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक निखिली पिंगळे, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी विद्यानंद चल्लावार, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुनिल जाधव, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट यांच्याह विविध विभागांचे अधिकारी, दिव्यांग संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राहावी यासाठी लॉटरी पद्धतीचा वापर करण्यात यावा, असे निर्देश देऊन पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले,

दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ घेताना कागदपत्रांच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी कागदपत्रांच्या प्रक्रियेत सुलभता आणणे गरजेचे आहे. यासाठी संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांशी लवकरच बैठक घेऊन संपूर्ण राज्यासाठी एक सर्वसमावेशक आणि सुटसुटीत निर्णय घेतला जाईल, असेही पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

* Satara * Vol- 12 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# तब्बल ३२५ फुटी तिरंग्याने कराड झाले तिरंगामय

## रॅलीत देशभक्तीचा जल्लोष; सर्व जाती-धर्मांच्या हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**कराड (हॅलो न्यूज)**

देशभक्तीच्या उत्साहाने भारावलेल्या वातावरणात कराडमध्ये गुरुवारी भव्य तिरंगा रॅली उत्साहात पार पडली. रॅलीचे मुख्य आकर्षण ठरलेला तब्बल ३५० फूट लांब तिरंगा ध्वज हजारो नागरिकांनी एकत्रितपणे हातात घेतला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विशेष म्हणजे या तिरंगा रॅलीत सर्व जाती-धर्मांच्या नागरिकांनी एकजुटीने सहभागी होत राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले.

या तिरंगा रॅलीत कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, आमदार मनोजदादा घोरपडे, माजी आमदार आनंदराव पाटील, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसीलदार कल्पना ढवळे, उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, यांच्यासह कराड मलकापूरचे नगरसेवक, नागरिक सहभागी झाले होते.



आमदार डॉ. अतुल भोसले म्हणाले, महाराष्ट्रातील अत्यंत चांगली तिरंगा रॅली आज कराडमध्ये झाली आहे. या रॅलीच्या माध्यमातून कराडकरांनी देशाचे नाव मोठे करण्याचे काम केले आहे. विशेषतः तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग कौतुकास्पद आहे. देशाचे भवितव्य तरुणांच्या हातात असून, देशाला बलशाली आणि विकसित करण्याची जबाबदारीही त्यांच्यावर आहे. १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे आपले ध्येय होते. आता देशाच्या विकासाचे उद्दिष्ट आपल्या समोर आहे. विकसित भारताच्या निर्मितीसाठी तरुणांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण क्षेत्राला मोठे महत्त्व दिले जात असून वैद्यकीय शिक्षणाच्या जागाही वाढविण्यात आल्या आहेत. नवउद्योजकता आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याचे काम सुरू आहे. तरुणांनी शिक्षण, कौशल्य आणि नवकल्पनांच्या माध्यमातून देशाचे नाव मोठे करावे, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

### ३२५ फुटी तिरंगा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

तिरंगा रॅलीमध्ये तब्बल ३२५ फूट लांब तिरंगा ध्वज हे विशेष आकर्षण ठरले. हजारो नागरिकांनी हा भव्य तिरंगा हातात घेऊन रॅलीत सहभाग नोंदविला. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत नागरिकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी वातावरण देशभक्तीने भारून गेले होते. विविध जाती-धर्मांचे नागरिक एकत्र येऊन तिरंग्याला मानवंदना देत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.

तिरंगा रॅलीच्या आयोजनात प्रशासनाने केलेल्या नियोजनाचेही त्यांनी कौतुक केले. मोठ्या संख्येने नागरिकांना एकत्र आणून शिस्तबद्ध पद्धतीने रॅलीचे आयोजन करण्यात प्रशासनाने चांगले काम केले आहे. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची ही संधी आहे. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे मनापासून आभार, असे ते म्हणाले.

आमदार मनोजदादा घोरपडे म्हणाले, आजची भव्य तिरंगा रॅली प्रत्येकाच्या मनातील देशाविषयीची कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त करणारी आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक आणि स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे ही आपली जबाबदारी आहे.

प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकवून देशाप्रती असलेले प्रेम व्यक्त करावे. स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. आजच्या तिरंगा रॅलीत सर्व जाती-धर्मांचे नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले, ही अभिमानाची बाब आहे, असेही मनोज घोरपडे यांनी सांगितले.

# संस्थेच्या जडणघडणीत कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे : डॉ. सुरेश भोसले

## कृष्णा विश्व विद्यापीठातील ६६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कृष्णा सेवागौरव पुरस्काराने सन्मान

**कराड (हॅलो न्यूज)**

कोणत्याही संस्थेच्या जडणघडणीत कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे असते. कर्मचाऱ्यांच्या टीमवर्कच्या माध्यमातूनच संस्थेची प्रगती शक्य होते, असे प्रतिपादन कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी केले. कृष्णा विद्यापीठ व कृष्णा हॉस्पिटलमध्ये दीर्घकाळ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या ६६ कर्मचाऱ्यांना कृष्णा सेवा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर कृष्णा विश्व विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य श्री. विनायक भोसले, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन. उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे उपस्थित होते.

यावेळी डॉ. भोसले म्हणाले, नोकरीचे ठिकाण हे कर्मचाऱ्यांना ओळख मिळवून देते. कर्मचाऱ्यांनी केलेल्या चांगल्या कामामुळे संस्थेची प्रगती होते. कर्मचारी हे संस्थेचे ॲसेट आहेत. प्रत्येकाच्या योगदानातून संस्था घडत असते. त्यामुळे संस्थेसाठी आयुष्यभर योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. सेवानिवृत्ती हा प्रवासाचा शेवट नसून नव्या पर्वाची सुरुवात आहे. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांनी आपल्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा.





कार्यक्रमाला कृष्णा विश्व विद्यापीठाच्या सहाय्यक कुलसचिव अस्मिता देशपांडे, नर्सिंग विभागाच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली मोहिते, फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. एन. आर. जाधव, कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसीच्या डॉ. शुभांगी पाटील, नर्सिंग डायरेक्टर रोहिणी बाबर यांच्यासह कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक विक्रम शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक व्यवस्थापक चेतन गोरे यांनी स्वागत केले. जगजीत घोरपडे यांनी आभार मानले.



# कृष्णा विश्व विद्यापीठात ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कराड (हॅलो न्यूज)**

कृष्णा विश्व विद्यापीठाच्या प्रांगणात कृष्णा उद्योग व शैक्षणिक समूहाच्यावतीने ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कृष्णा उद्योग व शैक्षणिक समूहातील विविध सिक्युरिटी फोर्सच्या जवानांनी व विद्यार्थ्यांनी शानदार ध्वजसंचलन केले. कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या हस्ते व आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर डॉ. सुरेश भोसले यांच्यासोबत आ.डॉ. अतुलबाबा भोसले, कुलगुरु डॉ. नीलम मिश्रा व उपकुलसचिव एस. ए. माशाळकर यांनी सुरक्षारक्षकांकडून मानवंदना स्वीकारली.

याप्रसंगी सौ. उत्तरा भोसले, सौ. गौरवी भोसले, श्री. विनायक भोसले, कृष्णा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे, कार्यकारी संचालक पी. डी. जॉन, डॉ. रजनी गावकर, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्योत्स्ना पाटील, संशोधन संचालक (नि. ब्रिगेडियर) डॉ. हिमाश्री, डॉ. डी. के. अगरवाल, डॉ. एस. आर. पाटील, कृष्णा हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. विजय कणसे, डॉ. जी. व्ही. रामदास, कराडचे नगरसेवक शिवाजी पवार, जनशक्ती आघाडीचे अध्यक्ष अरुण जाधव, माजी नगरसेवक अतुल शिंदे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# वसंतगडच्या माने हायस्कूल व ज्यु. कॉलेजमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**कराड (हॅलो न्यूज)**

वसंतगड (ता. कराड) येथील श्री चंद्रसेन शिक्षण संस्थेच्या श्री वि. ग. माने हाय. व ज्युनि. कॉलेज, मध्ये भारताचा ८० स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम घेण्यात आले. त्यानंतर माजी सैनिक सुनील गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी चंद्रसेन शिक्षण संस्थेचे सचिव रघुनाथ नलवडे, उपाध्यक्ष महीपती कोकरे, सरपंच ॲड. अमित नलवडे, चंद्रकांत पाटील तानाजीराव वाघमारे, मुख्याध्यापक मंदार दीक्षित, पर्यवेक्षक शिवाजी पाटील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

# कला शिक्षक अमर भागवत यांना 'विवेकरत्न' गुरुदेव पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर (हॅलो न्यूज)**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने सन २०२४-२५ चा स्वामी विवेकानंद विवेकरत्न गुरुदेव पुरस्कार कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज पाटण या माध्यमिक विद्यालयाचे उत्कृष्ट फलक लेखनकार, उत्कृष्ट व्यक्तीचित्रकार, निखळ स्वभाव असणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व,विद्यार्थी प्रिय कला शिक्षक अमर भागवत यांना नुकताच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालय,





कोल्हापूर येथे झालेल्या कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणेचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमारजी साळुंखे होते.

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्रशासन प्राचार्य सीताराम गवळी, सहसचिव अर्थ प्राचार्य मिलिंद हुजरे, अध्यक्ष विद्या समिती तथा विभाग प्रमुख कोल्हापूर श्रीराम साळुंखे, विभाग प्रमुख रायगड-ठाणे-मुंबई प्राचार्य उत्तम गलांडे, पुणे जिल्हा विभाग प्रमुख प्राचार्य श्री. साकोरे तसेच एस. के. कुंभार, आर. के. भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

विवेकरत्नफ गुरुदेव पुरस्कार मिळाल्याबद्दल कला शिक्षक अमर भागवत सर यांचे विद्यालयाचे प्राचार्य बी.पी.देसाई, उप प्राचार्य, पर्यवेक्षक, विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग व आजी- माजी विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# ओगलेवाडी येथे रामकृष्ण वेताळ यांच्या उपस्थितीत तिरंगा रॅलीचा दिमाखदार सोहळा

**ओगलेवाडी (हॅलो न्यूज)**

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील ओगलेवाडी येथे भाजपा किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य आणि दिमाखदार तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. तिरंग्याच्या सन्मानार्थ तसेच विद्यार्थी, युवक आणि नागरिकांच्या मनात देशप्रेम, राष्ट्रभक्ती व राष्ट्रनिष्ठेची भावना अधिक दृढ व्हावी. या उदात्त हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आत्माराम विद्यामंदिर ओगलेवाडी, न्यू इंग्लिश स्कूल ओगलेवाडी आणि माध्यमिक विद्यामंदिर हजारमाची येथील शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या रॅलीत



सहभागी झाले.

या रॅलीस भाजपा किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम, माजी पंचायत समिती सदस्य सुरेश कुंभार, माजी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत मदने, जिल्हा चिटणीस शंकरराव शेजवळ, सुदाम चव्हाण तात्या, संजय पिसाळ, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत पडवळ, अनुसूचित जाती मोर्चाचे विलास आटोळे, किसान मोर्चाचे उपाध्यक्ष विकास अण्णा गायकवाड यांच्यासह विजय सावंत, रुक्मिणीताई जाधव, उषाताई नलवडे, अमित पाटील, सागर चव्हाण, वैष्णवी पळसे, राजेंद्र चव्हाण, नवीन जगदाळे, दीपक इंगवले, पिंटू मोरे, बाबुराव चौधरी, बाळासाहेब पोळ, रघुनाथ शेडगे, मुकुंद गोळे, दादासो डुबल, सतीश पवार, राजाराम काटवटे, पितांबर गुरव, मनोज वीर, उपसरपंच सागर हाके, संभाजी कुंभार, विनोद डुबल, मानसिंग मुळीक, अनिल पोळ, कुमार इंगळे, अक्षय नाटकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीदरम्यान लहान मुलांना खाऊचे वाटप करून त्यांच्यामध्येही राष्ट्रप्रेमाची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून तो देशाची एकता, अखंडता, शौर्य आणि अभिमानाचे प्रतीक आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**राष्ट्रभक्ती व राष्ट्रनिष्ठा जागृतीसाठी रॅलीचे आयोजन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी तरुणांमध्ये राष्ट्रभक्ती व राष्ट्रनिष्ठा निर्माण व्हावी. या तिरंगा रॅलीत हजारो विद्यार्थ्यांनी तरुणांनी सहभाग घेतला. यापुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रम राबवत राहणार.

**– रामकृष्ण वेताळ**
**प्रदेशाध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र**

# राजकीय व्यक्तींच्या वाढदिवसासाठी नियम बदलले

## झाकीर पठाण : पालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड शहराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी कराड नगरपालिकेने फ्लेक्स बोर्ड लावण्यास बंदीचा ठराव असताना माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसासाठी हा ठराव बदलण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे अल्पसंख्यांक विभागाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष झाकीर पठाण यांनी केला. राजकीय व्यक्तींच्या वाढदिवसासाठी नियम बदलले जात असतील, तर पालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होते, अशी टीकाही त्यांनी केली. शासकीय विश्रामगृहात काँग्रेसच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी कराड शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. अमित जाधव, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष आनंदराव लादे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



झाकीर पठाण म्हणाले, शहरात फ्लेक्स बोर्ड लावण्यासाठी पालिकेची रीतसर परवानगी घेतली जात नाही. कमी आकाराच्या फ्लेक्ससाठी परवानगी घेऊन प्रत्यक्षात मोठे फ्लेक्स लावले जातात. परवानगीची मुदत एक दिवसाची असतानाही अनेक फ्लेक्स चार-पाच दिवस कायम ठेवले जातात. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होण्याबरोबरच पालिकेचा महसूलही बुडत आहे. फ्लेक्स बोर्डच्या परवानगीसाठी पालिकेकडे किती अर्ज आले, याची माहिती मुख्याधिकाऱ्यांकडे मागितली होती. मात्र, असे अर्जच प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी सांगितल्याचा दावा पठाण यांनी केला.

मग शहरातील फ्लेक्स कोणाच्या परवानगीने लावले जातात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यापूर्वी काही नगरसेवकांनी नियमबाह्य फ्लेक्स लावल्याची तक्रार करून संबंधितांवर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांना लेखी आदेश दिले. मात्र, या आदेशांची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचा आरोप पठाण यांनी केला. संबंधितांना कोणाचा राजकीय वरदहस्त आहे, असा सवाल करत कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. तसेच शहरातील विविध इमारतींवर मोठमोठे होर्डिंग्ज उभारण्यात आले आहेत. त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी पठाण यांनी यावेळी केली.

# मनोज जरांगे पाटील यांचे तारुख येथे उत्साहात स्वागत

**तारुख (हॅलो न्यूज)**

पश्चिम महाराष्ट्र दौऱ्यादरम्यान मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्वकर्ते मनोजदादा जरांगे पाटील यांचे मौजे तारुख, ता. कराड येथे तारुख गावासह परिसरातील मराठा बांधवांकडून अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले.

मनोज जरांगे पाटील यांचे तारुख येथे आगमन होताच उपस्थित मराठा बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दुमदुमून टाकला. गावकऱ्यांच्या वतीने जेसीबीच्या सहाय्याने फुलांची उधळण व पुष्पवृष्टी करून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

गावात दाखल झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवराज कुराडे पाटील, विवेक कुराडे पाटील, विक्रांत कुराडे



पाटील, माजी पंचायत समिती सभापती प्रदीप पाटील, सरपंच सचिन कुराडे, सुहास पाटील, विक्रम पाटील, दत्ता पाटील, बाळू बापू, सूरज शेवाळे, आबा चोपडे, अंकुश कुराडे, हणमंत भिसे, राजेंद्र सुपनेकर, राम कुराडे, संजूबाबा तसेच तारुख व परिसरातील सर्व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिवसमर्थचा वर्धापनदिन : ठेवीदारांना १ टक्का जादा व्याज

**सातारा (हॅलो न्यूज)**

महाराष्टातील अग्रगण्य वित्तीय संस्था म्हणून नावाजलेल्या शिवसमर्थ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि; तळमावले चा वर्धापनदिना निमित्त संस्थेने ठेवीदारांसाठी एक विशेष योजना जाहीर केली आहे. १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२६ या एक महिन्याच्या कालावधीत संस्थेत ठेवण्यात येणाऱ्या मुदत ठेवींवर (फिक्सड डिपॉझीट) नेहमीपेक्षा १ टक्के जादा व्याजदर दिला जाणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष ॲड. जनार्दन लक्ष्मण बोत्रे यांनी दिली आहे.

शिवसमर्थ मल्टिस्टेट आणि बालाजी ब्लड सेंटर, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. तसेच शिव आरोग्य सेवा मल्टि स्पेशालिटी




को-ऑप. हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर लि. यांच्या सहकार्याने शिव आरोग्य सेवा हॉस्पिटल, तळमावले येथे मोफत सर्वरोग आरोग्य तपासणी पार पडले. या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

# पवनचक्कीच्या केबल चोरी करणारी टोळी जेरबंद

## नऊ लाखांचा मुद्देमाल हस्तगत : पाटण पोलिसांची कारवाई

**पाटण (हॅलो न्यूज)**

सडावाघापूर व काठी येथील पठारावरील पवनचक्कीच्या तांब्याच्या केबल चोरी करणाऱ्या टोळीचा पाटण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीतील ६ जणांना पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून तांब्याच्या केबलसह चारचाकी गाडी असा तब्बल ९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याप्रकरणी सर्व संशयित आरोपींना पाटण न्यायालासमोर हजर केले असता त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असल्याची माहिती पाटण पोलिसांनी दिली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे कौशल्यपुर्वक तपास करुन सदर गुन्हे उघडकीस आणण्यात पाटण पोलिसांना यश आले आहे. तांब्याच्या तारा चोरीप्रकरणी रुपेश दिलीप पाटील (रा. पोतले, ता. कराड जि. सातारा), राहूल दादासाहेब कदम (रा. वडगाव ता. कराड), अनिल यशवंत सुतार (रा. सुतारवाडी, सणबुर, ता. पाटण), बबन बापू कस्तुरे व कृष्णात धोंडीराम गावडे (दोघे रा. महालक्ष्मीनगर, तिसरी गल्ली कदमवाडी, ताराबाई पार्क, कोल्हापूर ता. करवीर जि. कोल्हापूर), संतोष शामराव सरगर (रा. पाण्याच्या टाकीजवळ, चिखली, ता. कराड जि. सातारा)




या ६ जणांच्या टोळीला पाटण पोलिसांनी शिथाफीने अटक केली. पाटण तालुक्यातील सडावाघापूर, सडादाढोली येथील पवनचक्कीतील चोरी केलेली तांब्याच्या केबलसह छोटाहत्ती चारचाकी गाडी आदी ९ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. या सर्व संशयित आरोपींना पाटण न्यायालयासमोर हजर केले असता सर्वांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सदरची कामगिरी सातारा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती वैशाली कडुकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण विभाग सुदाम पाचोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाटण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश तारु, पोलीस उपनिरीक्षक बिपीन चव्हाण, राजेंद्र सदगर, संजय राऊत, आनंदा आव्हाड, पोलीस हवालदार वैभव पुजारी, उमेश गोरे, अमृत आळंदे, दादासाहेब लोंढे, आबासाहेब गलांडे, संतोष माने, संतोष कुचेकर, शरद गुरव, राजेंद्र मोहिते, हणमंत नलवडे, केतन नाकाडे, आशिष कांबळे, मच्छिंद्र जाधव यांनी केलेली आहे.